विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून
राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे
नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने
लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रेड, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर,
शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २४१ वा | सोमवार, दि. ०४ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर,
मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

# पुन्हा महाराष्ट्र हादरलं!

## चिमुकलीवर अत्याचार करून हत्या; आरोपीचा थरारक कबुलीजबाब, संतप्त नागरिकांचा उद्रेक

### या हरामी नराधमाचा चौरंग करून कडेलोट करा...!

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** नसरापूर येथे अवघ्या साडेतीन ते चार वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले असून नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

**सीसीटीव्हीतून उलगडा, गावकऱ्यांनी आरोपी पकडला**

शुक्रवारी दुपारच्या सुमारास चिमुकली बेपत्ता झाल्यानंतर गावात शोधमोहीम सुरू करण्यात आली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपी भीमराव कांबळे हा मुलीला गोठ्याकडे नेत असल्याचे दिसून आले. मात्र, मुलगी पुन्हा बाहेर येताना दिसली नाही. संशय बळावल्याने गावकऱ्यांनी आरोपीचा शोध घेत त्याला पकडले.

**अमानुष कृत्याची धक्कादायक माहिती समोर**

तपासात आरोपीने चिमुकलीला खाऊचे आमिष दाखवून गोठ्यात नेल्याचे स्पष्ट झाले आहे. ह्यावासरू दाखवतोह्न असे सांगून त्याने तिचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर हे कृत्य केले. या घटनेने समाजमन सुन्न झाले आहे.

**चोप दिल्यानंतर दिला कबुलीजबाब; मृतदेह शेणात लपवला**

सुरुवातीला आरोपीने माहिती देण्यास टाळाटाळ केली. मात्र, गावकऱ्यांनी चोप दिल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. गोठ्यात अत्याचार करून हत्या केल्यानंतर चिमुकलीचा मृतदेह शेणात लपवल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला.






**पूर्वीचे गुन्हे उघड; विकृत प्रवृत्तीचा इतिहास**

तपासादरम्यान आरोपीचा गुन्हेगारी भूतकाळही समोर आला आहे. याआधीही त्याच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप असून, तुरुंगातून सुटल्यानंतर त्याने पुन्हा हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्याची विकृत प्रवृत्ती जुनी असून त्याला यापूर्वी गावातून हाकलूनही देण्यात आले होते.

**संतप्त नागरिकांचा उद्रेक; नवले पुलावर रास्तारोको**

घटनेनंतर संतप्त नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले. पुण्यातील नवले पुलावर चिमुकलीचा मृतदेह ठेवून रास्तारोको करण्यात आला. तब्बल चार तास मुंबई-बंगळुरू महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. आंदोलकांनी मुख्यमंत्री घटनास्थळी येईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका घेतली.

**पोलिसांची हस्तक्षेप कारवाई; वादाचे वातावरण**

दीर्घ चर्चेनंतरही आंदोलन मागे न घेतल्याने पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना हटवले. या कारवाईदरम्यान पोलिसांकडून बळाचा वापर झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला. मात्र, पोलिसांनी हे आरोप फेटाळून लावत कोणताही लाठीमार झालेला नसल्याचे स्पष्ट केले.

**जलद न्यायाची मागणी; बाल हक्क आयोगाची दखल**

या प्रकरणाची बाल हक्क आयोगाने गंभीर दखल घेतली असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा, शक्यतो मृत्यूदंड देण्याची शिफारस करण्याचे संकेत दिले आहेत. पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो आणि इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला असून तपास वेगाने सुरू आहे.

**कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

या घटनेनंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे महिलांची व मुलांची सुरक्षितता धोक्यात आल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे.

**न्यायासाठी एकच हाक कठोर शिक्षा द्या!**

या अमानुष घटनेनंतर सर्व स्तरांतून एकच मागणी होत आहे. आरोपीला तातडीने कठोर शिक्षा द्यावी आणि अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात.

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी
ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

### 'जल जीवन मिशन'ला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेला गती देण्यासाठी केंद्र सरकारने जल जीवन मिशन (JJM) या महत्त्वाकांक्षी योजनेची मुदत डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. जलसंपदा विषयक स्थायी समितीच्या १९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी जल जीवन मिशन अंतर्गतील



कामांच्या थकीत देयकांचा गंभीर प्रश्न उपस्थित केला होता. त्याचबरोबर संसदेतील सभागृहात देखील ठेकेदार व अंमलबजावणी यंत्रणांना देयके वेळेत न मिळाल्याने कामांची गती मंदावत पाणीपुरवठा योजनांच्या कामांवर परिणाम होत असल्याचे त्यांनी केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

समितीसमोर सादर करण्यात आलेल्या उत्तरात केंद्र शासनाने स्पष्ट केले की, 'जेजेएम २.०' अंतर्गत योजनेची पुनर्रचना करण्यात आली असून ग्रामीण पाणीपुरवठा क्षेत्रात संरचनात्मक सुधारणा करण्यावर भर दिला जाणार आहे. यासाठी वाढीव आर्थिक तरतूद करण्यात आली असून, केंद्राकडून राज्यांना अनुदान जेजेएम २.० च्या कार्यकारी मार्गदर्शक सूचनांनुसार वितरित केले जाईल.

दरम्यान, थकीत देयके लवकरात लवकर अदा करून सुरू असलेल्या कामांना गती देणे आवश्यक असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या या पाठपुराव्यामुळे व केंद्र सरकारने जलजीवन मिशनच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयामुळे देशातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांना नवसंजीवनी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## कार चालकाच्या प्रसंगावधानाने वाचले विद्यार्थिनीचे शैक्षणिक वर्ष!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** प्रसंगावधान आणि माणुसकी जिवंत असेल, तर कठीण प्रसंगातही मार्ग सापडतो, याचाच प्रत्यय आज सोलापुरात पाहायला मिळाला. NEET UG परीक्षेसाठी चुकीच्या केंद्रावर पोहोचलेल्या एका विद्यार्थिनीला अवघ्या ५ मिनिटांत योग्य केंद्रावर पोहोचवून, कार चालक विरेश कंदगुळे यांनी तिचे वर्ष वाया जाण्यापासून वाचवले. त्यांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.

रविवार, ३ मे २०२६ रोजी NEET UG परीक्षा होती. सोलापुरातील अक्कलकोट रोडवरील 'एस व्ही सी एस' शाळा येथे एका विद्यार्थिनीला तिच्या आईने परीक्षा केंद्रावर सोडले. आत गेल्यावर शिक्षकांनी कागदपत्रे तपासली असता, तिचे परीक्षा केंद्र हे अक्कलकोट रोड एस व्ही सी एस नसून भवानी पेठ 'एस व्ही सी एस' असल्याचे समोर आले.

या गोंधळात वेळ दुपारी १:२२



ची झाली होती. केंद्राचे गेट दुपारी १:३० वाजता बंद होणार होते. हाती फक्त ८ मिनिटे होती. आईला फोन लावला असता तो लागला नाही, ज्यामुळे विद्यार्थिनी घाबरून रडायला लागली.

विद्यार्थिनीचे रडणे पाहून तेथील शिक्षकांनी केंद्राबाहेरील पालकांना मदतीचे आवाहन केले. त्यावेळी तेथे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष आणि डॉ. अरुंधती हराळकर यांच्या मुलाला परीक्षेसाठी सोडण्यासाठी आलेले मिताली ट्रॅव्हल्सचे चालक विरेश कंदगुळे हे तातडीने पुढे आले.

वेळेचे गांभीर्य ओळखून १:२४ वाजता त्यांनी विद्यार्थिनीला कारमध्ये बसवले. अक्कलकोट रोड ते भवानी पेठ हे अंतर कापण्यासाठी त्यांच्याकडे खूपच कमी वेळ होता. जर १:३० च्या आत ती पोहोचली नसती, तर तिचे वर्षभराचे कष्ट वाया गेले असते.

कोणताही विलंब न लावता, विरेश कंदगुळे यांनी शिताफीने गाडी चालवत अवघ्या ५ मिनिटांत म्हणजेच १:२९ वाजता भवानी पेठ येथील परीक्षा केंद्र गाठले. अवघ्या एक मिनिटाचा अवधी शिल्लक असताना ती विद्यार्थिनी केंद्रात प्रवेश करू शकली.

ओळखीचा संबंध नसताना केवळ एका विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या उदात्त भावनेतून विरेश कंदगुळे यांनी केलेल्या या मदतीमुळे सोलापूरच्या 'स्मार्ट' माणुसकीचे दर्शन घडले आहे. शिक्षकांनी आणि पालकांनी त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

## जिने मदत केली तिच्यावरच उलटला, दीराने वहिनीसह 2 पुतण्यांची केली हत्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हैदराबाद महामार्गावरील बोरामणी जवळ असलेल्या मस्के वस्तीवर शुक्रवारी रात्री तिहेरी हत्याकांडाची घटना घडली. इथं दीराने आपल्या वहिनीची आणि तिच्या दोन मुलांची निर्घृणपणे हत्या केली आहे.

यामध्ये आई, मुलगी आणि १७ वर्षीय मुलाचा समावेश असून, या घटनेनं संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. आरोपी दीराने एकेकाळी मदत केलेल्या वहिनीलाच निर्घृणपणे संपवलं आहे. या प्रकरणी आता सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य आरोपी शंकर उर्फ पप्पू दत्तात्रय म्हस्के, त्याची पत्नी राणी, मुलगा धीरज, मुलगी दीक्षा, त्याचा मेहुणा सूरज मोरे आणि शेजारी वाघमारे नावाचा मुलगा अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावं आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तपासासाठी काही जणांना ताब्यात घेतलं आहे. तर गायत्री सुधाकर मस्के (३६), त्यांची मुलगी



प्रियंका सुधाकर मस्के (२०) आणि मुलगा शिवराज सुधाकर मस्के (१७) असं हत्या झालेल्या तिघांची नावं आहेत.

बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील मस्के कुटुंब आपल्या शेतातील घरात वास्तव्यास होते. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने गायत्री सुधाकर मस्के (३६), त्यांची मुलगी प्रियंका सुधाकर मस्के (२०) आणि मुलगा शिवराज सुधाकर मस्के (१७) हे तिघेही रात्री घराच्या गच्चीवर झोपण्यासाठी गेले होते. वस्तीवर इतर कुणीही नसल्याचा फायदा घेत अज्ञात हल्लेखोरांनी गच्चीवर चढून त्यांच्यावर तलवारीने सपासप वार केले.

या भीषण हल्ल्यात गायत्री आणि प्रियंका यांचा जागीच मृत्यू झाला. यावेळी १७ वर्षांच्या शिवराजने आपल्या आई आणि बहिणीला वाचवण्यासाठी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. हल्लेखोरांनी त्याच्या हातावर वार केल्यानंतर, तो जीव वाचवण्यासाठी गच्चीवरून खाली खोलीच्या दिशेने पळाला. मात्र, निर्दयी हल्लेखोरांनी त्याचा पाठलाग केला. तो खाली पोहोचताच त्याला गाठून त्याच्यावर तलवारीने वर्मी घाव घालून त्यालाही संपवण्यात आलं. जिने मदत केली तिलाच निर्घृणपणे संपवलं

या घटनेची अधिक माहिती देताना पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी सांगितलं की, मयत महिला आरोपीची वहिनी आहे. आरोपीला दोन भाऊ होते. पण दोघांचं निधन झालं आहे. हा एकटाच जिवंत आहे. या तिन्ही कुटुंबामध्ये वडीलोपार्जित संपत्तीवरून वाद सुरू होता. तसेच मयत वहिनीने आरोपीला २५ लाख रुपये हात उसणे दिले होते. मागील काही काळापासून वहिनीने याच पैशांसाठी आरोपीकडे तगादा लावला होता. याच कारणातून हा गुन्हा घडला असावा, असं प्रथमदर्शनी केलेल्या तपासातून दिसून येत आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. मुख्य आरोपीच्या शोधासाठी तीन पोलीस पथकं आणि स्थानिक गुन्हे शाखेची पथकं रवाना झाली आहेत. घटनेचा तपास सुरू आहे.

## मंत्री महाजनांना 'इथून चालते व्हा' असं म्हणालेली महिला आली समोर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** वरळी परिसरातील आंदोलनादरम्यान संताप व्यक्त करून मंत्री गिरीश महाजन यांना "इथून चालते व्हा" असं म्हणालेली महिला अखेर समोर आली असून, व्हायरल व्हिडिओमागचं सत्य उघड झालं आहे. टीना चौधरी या महिलेने स्वतः पुढे येत त्या दिवशी घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती दिली आहे. त्यांच्या मते, लोकांनी फक्त त्यांचा संताप पाहिला, मात्र त्या संतापामागील परिस्थिती आणि अगतिकता लक्षात घेतली गेली नाही.

**'दीड तास ट्रॅफिकमध्ये अडकले, मदतीला प्रतिसाद नाही'**

२१ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास वरळी परिसरात आंदोलनामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. टीना चौधरी या आपल्या मुलासोबत गाडीत अडकल्या होत्या. दीड तासाहून अधिक काळ ट्रॅफिकमध्ये अडकून पडल्याने त्या अत्यंत अस्वस्थ झाल्या. त्यांनी वारंवार पोलिसांकडे मदत मागितली, मात्र अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याच संतापातून त्यांनी




घटनास्थळी पोलिसांशी व महाजनांशी तीव्र वाद घातल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये त्या संतप्त अवस्थेत पोलिसांना जाब विचारताना दिसतात. या घटनेवरून सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटल्या होत्या.

टीना चौधरी यांनी स्पष्ट केलं की, 'लोकांनी फक्त माझा राग पाहिला, पण त्या मागचं कारण समजून घेतलं नाही. एका आईची असहाय्यता आणि मुलाबद्दलची काळजी यातूनच हा उद्रेक झाला.ह्व त्यांनी प्रशासनाने अशा परिस्थितीत नागरिकांना वेळेवर मदत देणं आवश्यक असल्याचंही नमूद केलं.

या घटनेनंतर मुंबईतील मोठ्या आंदोलनांदरम्यान होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना अडचणींना सामोरं जावं लागत असल्याने प्रशासनाने पयार्यी उपाययोजना अधिक सक्षम करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणामुळे पोलिसांच्या प्रतिसादक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांना वेळेवर मदत न मिळाल्यास अशा घटना घडण्याची शक्यता वाढते, असा सूर नागरिकांतून उमटत आहे.

या संपूर्ण घटनेतून एक गोष्ट स्पष्ट होते—अडचणीत सापडलेल्या नागरिकांना तातडीने मदत मिळाली, तर अशा प्रकारचे वाद टाळता येऊ शकतात. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्याची गरज यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे.

## अक्कलकोटला नवा विकासमार्ग : राष्ट्रीय महामार्ग 465 रुंदीकरणासाठी 740 कोटी

**जेऊर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग 465 मोहोळ-कुरुल - कामती-बसवनगर-औराद-बंकलगी-वळसंग या 81.37 किमी मार्गाच्या रुंदीकरणासाठी 740.38 कोटी रुपयांच्या तरतूदीसह मंजुरी देण्यात आली आहे.त्यामुळे औराद ते वळसंग हा महत्वाचा आणि दुर्लक्षित रस्ता पूर्ण होणार असल्याने विजयपूर भागातून सोलापूर शहरात न येता तो अक्कलकोट विधानसभा क्षेत्राला वळसंग येथे जोडला जाणार आहे. (पान 2 वर..)



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

वात्रटिका

**वरून किर्तन**

जगासमोर उभं राहून
कंबर बांधून केले किर्तन...
सांगितले लोकांना,दिले धडे
त्याहून वेगळे वागणे वर्तन...
भाऊक क्षण जरी असले
लग्न लेकीचे हौस भारी...
बोललेच लोक काही तर
मग करणार सारवासावरी...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# न्यायव्यवस्थेचा प्रश्न की राजकारणाचा खेळ?

राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालला आहे. नागरिकांच्या मनात एक मूलभूत अपेक्षा असते. गुन्हा कोणाचाही असो, न्याय मात्र निष्पक्ष आणि कठोर असावा. परंतु अलीकडील काही घटनांकडे पाहता ही अपेक्षा पूर्ण होत असल्याचे चित्र दिसत नाही, अशी टीका वाढताना दिसते. विविध प्रकरणांमध्ये 'क्लीन चीट' देणे, काही संवेदनशील गुन्ह्यांमध्ये विलंब, तर काही ठिकाणी आरोपींना मिळणारी सवलत या सगळ्यामुळे सामान्य माणसाच्या मनात संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. न्याय देण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि सातत्य नसेल, तर कायद्यावरील विश्वास ढासळतो. विशेषतः महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये किंवा समाजमन हादरवणा ्या घटनांमध्ये जर ठोस आणि वेगवान कारवाई झाली नाही, तर त्याचे दुष्परिणाम दूरगामी असतात.

न्यायव्यवस्थेचा मूलमंत्र ह्यसर्वांसाठी समान कायदा' असा आहे. मात्र पद, पैसा, प्रतिष्ठा, जात किंवा राजकीय निष्ठा यांच्या आधारे निर्णय घेतले जात असल्याची भावना निर्माण झाली, तर तो लोकशाहीसाठी धोक्याचा इशारा ठरतो. अशा वातावरणात गुन्हेगारांची भीती कमी होते आणि कायद्याचा धाक संपतो. परिणामी, निष्पाप नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनतो.

याचबरोबर, सत्तेचा वापर प्रशासनातील बदल्या, राजकीय समीकरणे आणि वैयक्तिक फायद्यासाठी होत असल्याच्या आरोपांनी परिस्थिती अधिकच चिंताजनक बनवली आहे. शासनाचा केंद्रबिंदू जनतेची सुरक्षा आणि न्याय असायला हवा; पण तो राजकीय व्यवस्थापनात अडकला, तर शासनाची विश्वासार्हता कमी होते.

धर्म, विचारधारा किंवा राजकीय ओळख यांच्या आड लपून प्रशासनातील त्रुटी झाकण्याचा प्रयत्न होणेही तितकेच घातक आहे. कारण शासनाचे मूल्यमापन हे कामगिरीवर आणि निर्णयांच्या गुणवत्तेवर व्हायला हवे, घोषणांवर किंवा प्रतिमांवर नव्हे.

आज गरज आहे ती स्पष्ट उत्तरांची, पारदर्शक कारवाईची आणि जबाबदारी स्वीकारण्याची. गुन्हेगार कोणताही असो, त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि पीडितांना त्वरित न्याय मिळाला पाहिजे. हीच खरी लोकशाहीची कसोटी आहे.

अन्यथा, न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कमी होत गेला, तर त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागेल.

पान १ वरून

## अक्कलकोटला नवा विकासमार्ग ...

त्यामुळे सोलापूर येथील ताण कमी होऊन अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनास येणाऱ्या आणि कर्नाटक भागातील विजयपूर व परिसरातील अनेक भागातून नाशिक ते चेन्नई या रस्त्याला अक्कलकोट ट्रम्पेट इंटरचेंज येथे जोडला जाणार असल्याने या भागातील विकासाला मोठा मदत होणार आहे.या संदर्भात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सोसियल मिडीया द्वारे ही माहिती शेअर केली आहे.सदर प्रकल्पामध्ये सीना नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे, आहेरवाडी फाट्यावर रेल्वे उड्डाणपूल बांधणे व मार्गाचे रुंदीकरण काम समाविष्ट आहे. या कामामुळे कर्नाटक राज्याकडून येणारी जड वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्यास मदत होईल, ज्यामुळे अंतरराज्यीय वाहतुकीस चालना मिळेल. हा रस्ता सोलापूर शहराला पर्यायी बाह्यवळण रस्ता म्हणून काम करेल. तसेच शहरातून जाणारी जड वाहनांची वाहतूक या मार्गाने वळविण्यात येईल व शहरातील वाहतूक गर्दी कमी करण्यास मदत होईल.या प्रकल्पामुळे मोहोळ ते वळसंग पट्ट्यातील प्रमुख गावांचा थेट संपर्क सुधारेल, शेतमाल वाहतूक सुलभ होऊन शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल, तसेच प्रवासाचा वेळ व इंधन खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. संजवाड येथे सीना नदीवरील मोठा पूल, आहेरवाडी फाटा येथे रेल्वे उड्डाणपूल तसेच विविध छोटे पूल व सीडी वर्क्सची कामे या प्रकल्पात समाविष्ट आहेत, ज्यामुळे सुरक्षित व सक्षम पायाभूत सुविधा उभारणीस चालना मिळेल. या मुळे अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील तिलाटी गेटपासून पुढे आचेगांव, वळसंग पर्यंत रस्ता या मार्गाने होणार आणि पुढे तो कर्जाळ मार्गे अक्कलकोट रस्त्याला राष्ट्रीय महामार्गास जोडला जाणार असल्याने या भागाच्या विकासाला मोठी संधी मिळणार आहे. अक्कलकोट विधानसभा भागातील रस्ते सुधारण्यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी करत असलेल्या अथक प्रयत्नाला यामुळे आणखी जोड मिळणार आहे.

## श्री सयाजीनाथ महाराज विद्यालयास घवघवीत यश



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** इंडीयन रेडक्रॉस सोसायटी आंतरशालेय बक्षीस वितरण समारंभामध्ये श्री, सयाजीनाथ महाराज विद्यालयास घवघवीत यश प्राप्त झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ भारती उपाध्ये (वाईस प्रिन्सिपल बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे), डॉ. शांतनु गोखले (चेअरमन रेड क्रॉस सोसायटी) तसेच प्रा. आर वी. कुलकर्णी (सेक्रेटरी रेडक्रॉस सोसायटी) यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

विद्यालयास समुहगीत स्पर्धेमध्ये माध्यमिक विभागास प्रथम व प्राथमिक विभागास द्वितीय क्रमांक प्राप्त झाला, पथनाट्य स्पर्धेमध्येमध्ये ज्युनिअर कॉलेज विभागास द्वितीय क्रमांक व माध्य. विभागास तृतीय क्रमांक प्राप्त झाला. वैयक्तिक स्पर्धामध्ये निबंध स्पर्धेमध्ये चि. सुजल सावंत यास द्वितीय व वक्तृत्व स्पर्धेमध्ये कु. श्रावणी जोगदंड हिस द्वितीय क्रमांक व कु. श्रेया यमलवार हिस प्रथम क्रमांक प्राप्त झाला. पूर्व प्राथ. विभागामध्ये कु. अनन्या काकडे हीस निबंध स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त झाला. कु. गौरी सत्वधर, कु ज्ञानेश्वरी सगळे व कु. तनुजा शिंदे यांनीउल्लेखनीय कामगिरी केली. विद्यालयातील शिक्षक डॉ. वाघ कल्याण, सौ भोई ज्योती, श्रीम. देवकर सोनाली, श्रीम. कुलकर्णी दाक्षायनी व मोहरीर रोहित यानी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन अध्यक्ष आ. रामभाऊ मोझे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, संजय मोझे व मा, प्राचार्य राजकुमार गायकवाड सर प्राथमिक विभाग मुख्याध्यापक सुधीर शिंगटे यांनी केले व पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती भारती कांबळे यांनी केले.

अशी माहिती श्री सयाजीनाथ महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य गायकवाड यांनी दिली.

# वेळीच सावध व्हा! यंदा बदलत्या हवामानामुळे उन्हाचे चटके, दुष्काळाचे सावट व मान्सूनवर 'एल निनो' चे संकट

दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे वातावरणात आमुलाग्र बदल होतांना दिसतो.यामुळे अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून पाण्याचा दुष्काळ पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.सध्याच्या परिस्थितीत राज्यासह देशातील अनेक भागात ४० ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पोहोचले आहे, म्हणजे सर्वत्र तापमानाने ४० अंश सेल्सिअस तापमान पार केल्याचे स्पष्ट दिसून येते.काही भागात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस पडत आहे.यामुळे संपूर्ण वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. राज्यासह देशातील ज्या शहराचे तापमान जास्तीत जास्त फक्त ४० अंश सेल्सिअस पर्यंत रहात होते त्या संपूर्ण शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पार केल्याचे दिसून येते.हा तापमान वाढीचा प्रकार अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे दिवसेंदिवस वाढत्या तापमानामुळे मोठी बिकट आणि गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे.आज देशातील औद्योगिक, शहरीकरण,सिमेंट रोड, गाड्यांचा धुर,एसी, लोकांच्या वाढत्या सुखसुविधा यामुळे तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून याचा परिणाम आपणा सर्वांना भोगावा लागत आहे. अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून याचा परिणाम शेतीवर मोठ्या प्रमाणात पडत असुन यंदा दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांच्या डोक्यावर मंडरावतांना दिसत आहे.सोबतच राज्यात "एल निनो"मुळे भीषण पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.कारण प्रशांत महासागरामध्ये "एल निनो"ची स्थिती सक्रिय होत असल्याने मान्सूनच्या पावसावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे.यामुळे मान्सूनच्या उत्तरार्धात म्हणजे जुलै ते सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण अधिक कमी राहू शकते."एल निनो"मुळे महाराष्ट्रातील बहुतांश भागात विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात, नेहमीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.किनारी कोकण विभाग तसेच विदभार्तील काही भागात तुलनेने पावसाचे वितरण चांगले राहू शकते.परंतु सरासरीपेक्षा कमी पावसाचा धोका असल्याने खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.यंदाची भीषण उष्णता ही वाढते औद्योगिकीकरण, कार्बन उत्सर्जन आणि बेसुमार जंगलतोडीचा परिणाम आहे.ही समस्या तात्पुरती नसून भविष्यात महाभयानक संकटाची नांदी आहे यावर वेळीच लगाम कसली नाही तर भयावह संकट निर्माण होऊ शकते. कारण सध्याच्या परिस्थितीत विदभार्तील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४.२, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली --४३.२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत.यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे. कारण आजच्या परिस्थितीत विदर्भ हे जगातील हॉट शहरांमध्ये गणल्या गेले आहे ही चिंताजनक बाब आहे. देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे,तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार आणि येणारे "एल निनो"संकट मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली गंभीर आणि धोकादायक परिस्थिती आहे.असे सांगितले जाते की १४० वर्षानंतर हा "एल निनो" येत आहे ही महाभयंकर संकटांची नांदी आहे. पॅसिफीक महासागरात जेव्हा तापमान वाढते तेव्हा जगाचे हवामान चक्र बिघडते असे सांगितले जाते यालाच "एल निनो" म्हणतात.परंतु ही अत्यंत धोक्याची घंटा आहे.कारण "एल निनो"मुळे महासागराचे तापमान २ अंश सेल्सिअसने वाढल्याचे सांगितले जाते.महासागराचे तापमान वाढणे म्हणजे संपूर्ण सृष्टीला धोक्याचे संकेत आहे.कारण बदलत्या हवामानामुळे देशासह संपूर्ण जगात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून दिवसेंदिवस समुद्राचे पाणी वाढत आहे व जमीनीच्या पोटातील पाणी कमी-कमी होत आहे. हा सर्वप्रकार जंगलतोडीमुळे निर्माण झाला आहे.कारण शहरीकरण व आधुनिकीकरणामुळे जेवढेही पावसाचे पाणी पडते त्याच्या ८० टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते.कारण वाढत्या औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जमीनीत पाणी जाण्याचे मार्ग ८० टक्के मार्ग बंद झाले आहे.त्यामुळे पाणी जमिनीच्या मुळाशी जातच नाही.याचा परिणाम म्हणजे तापमानात वाढ व भीषण पाणी टंचाई दिसून येते.राज्यांच्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जाते आणि आता "एल निनो"च्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी होण्याची चिन्हे आहेत.यावर सरकारने उपाययोजना करण्याची सुरुवात केली आहे.परंतु या संपूर्ण परिस्थितीला सर्वात जास्त औद्योगिकरण, शहरीकरण व जंगलतोड जबाबदार आहे.जोपर्यंत राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड थांबणार नाही आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणार नाही तोपर्यंत आपण या भयावह घटनांवर मात करू शकणार नाही.त्यामुळे राज्यासह देशातील वाढते तापमान पहाता व वेळोवेळी बदलते हवामान पहाता वृक्षलागवड युद्धपातळीवर होणे आवश्यक आहे.मुख्यत्वेकरून राज्य सरकार, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यारये यांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केले पाहिजे.आजही राज्यासह देशातील अति दुर्गम भागात पिण्याच्या पाण्यासह अनेक गंभीर समस्या आहेत.यामुळे या भागात आपल्याला कुपोषण,भुकमरी असे भयावह चित्र दिसून येते.त्यामुळे पावसाचे पाणी रोखायचे असेल वृक्षलागवड करणे गरजेचे आहे अन्यथा शेतकऱ्यांचे हाल बेहाल होतील व याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागेल.

जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# ढोंगी- भोंदूंची शिवराय भक्ती

**शिवरायांना रामदासांपुढे झुकवणारा बागेश्वर बाबा असो; किंवा माथेफिरू आमदार संजय गायकवाड असो; त्याचेही विदेशी लेखक जेम्स लेन सारखेच झाले आहेत. ते 'वाहक' आहेत. त्यांचे 'बोलविते धनी' कोण, ते ओळखा.**



**ज्ञानेश महाराव**
(ज्येष्ठ पत्रकार)

थोर विचारवंत अँतोनिओ ग्राम्सी (इटाली, जन्मः २२ जाने.१८९१; मृत्यू : २७ एप्रिल १९३७) याने म्हटलंय की, "एखाद्या समाजाला नियंत्रित करून त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी इतिहासाचा वापर केला जातो!" ह्या प्रक्रियेला ग्राम्सी यांनी 'हेजिमनी' (धुरिणत्व) अशी संज्ञा दिलीय. या संज्ञेच्या कसोटीवर चुकीच्या इतिहासाला आणि वर्तमानाला तपासले की, समाज गुलाम कसा बनतो, ते स्पष्ट होते. ह्याच कसोटीवर आमदार संजय गायकवाड आणि धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर बाबा ह्यांच्या आगाऊ प्रकरणांची तपासणी केली पाहिजे.

बुलडाण्याचे शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित "शिवाजी कोण होता?" ह्या पुस्तकाच्या शीर्षकाच्या निमित्ताने आपल्या बेशरमपणाचे जे प्रदर्शन घडवले, ते संतापजनक ठरले आहे. पानसरे ह्यांचे हे पुस्तक १९८९ मध्ये, म्हणजे ३७ वर्षांपूर्वी प्रकाशित झालंय. त्यातील आणि मुखपृष्ठावरील छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या एकेरी उल्लेखाने आमदारसाहेबाचं माथं भडकलं. त्यांनी पुस्तकाचा तरुण प्रकाशक प्रशांत आंबी याला रातोरात फोन केला; आणि तोंडाचं संडास करून त्याच्यावर कोसळले. "शिवछत्रपती आज असते तर.." त्यांनी लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीला कलंक फासणाऱ्या ह्या वर्तनाबद्दल संजय गायकवाड यांना "हिरकणी टोक" दाखवले असते. इतकी बेताल भाषा संजय गायकवाड यांनी वापरली आहे.

संजय गायकवाड यांचा फोनवरचा शिवराळ हैदोस, हा शिवाजी राजांच्या एकेरी उल्लेखाचा संताप होता. तथापि, असा एकेरी उल्लेख यापूर्वी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, प्रबोधनकार ठाकरे (दगलबाज शिवाजी), गोळवलकर गुरुजी (विचारधन), सावरकर (सहा सोनेरी पाने), इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर, अलीकडेच निधन पावलेले "शिवचरित्र"कार गजानन मेहेंदळे यांच्यासह अनेक इतिहास अभ्यासकांच्या लेखनातून; शाहिरांच्या पवाड्यातून; कवी- गीतकारांच्या गाण्यातून आला आहे. ह्यात अनादर नाही. ह्याबद्दल गोविंद पानसरे यांनी आपले म्हणणे मांडले आहे. तसेच, ते गजानन मेहेंदळे यांनी प्रस्तावनेत सविस्तर लिहिले आहे. असे काही वाचणे- ऐकणे आणि मगच व्यक्त होणे, हे संजय गायकवाड यांना माहिती असण्याची शक्यता नसावी, ह्याची साक्षच त्यांनी दिलीय. ती गुलामगिरीची आहे.

नागपुरातही हेच घडले. दुगार्देवी मंदिराच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी सरसंघचालक मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह धीरेंद्र शास्त्री ऊर्फ बागेश्वर धाम उपस्थित होते. ह्यावेळी केलेल्या भाषणात - "वारंवारच्या युद्धाने थकलेल्या शिवरायांनी आपला जिरेटोप रामदास स्वामींच्या पायाशी ठेवला आणि वैराग्य जाहीर केले. तेव्हा रामदासांनी गुरू म्हणून शिवरायांना कर्तव्याची जाणीव करून दिली आणि जिरेटोप त्यांच्या माथ्यावर ठेवला!" असं बागेश्वर बाबा बरळला. त्याच बरोबर त्याचा "पर्ची फेम दिव्य दृष्टीचा बनाव"ही उघडा पडला. कारण असे काही बोलल्यावर आपली आणि आपल्याकडून असे वदवून घेणाऱ्यांची महाराष्ट्रात काय बेइज्जत होईल, ह्याचा अंदाज त्याच्या बोगस दिव्यदृष्टीला आला नाही. परिणामी, जे व्हायचे ते झाले. भोंदू बागेश्वरला माफी मागावी लागली.

मात्र, ह्यात त्याची चुकी नव्हती. त्याने जसे वाचले-ऐकले ते तो बोलला. रामदास स्वामी यांचे भक्तीतून समाजाला शक्ती देण्याचं कार्य ऐतिहासिक आहे. लेखनात मराठी भाषेचे अत्युत्तम सौंदर्य आणि सौष्ठव आहे. त्यातील गुणवर्णनाला जातीच्या मयार्दा आहेत. पण त्यांनी कुठेही "शिवाजीराजे माझे शिष्य आहेत / होते," असे म्हटलेलं नाही. त्या त्यांच्या पश्चात वर्णवर्चस्व लादू पाहणाऱ्यांच्या लबाड लेखनउड्या आहेत. त्यातून "शिवरायांनी रामदासांच्या झोळीत स्वराज्य टाकले!", "शिष्य परीक्षा घेण्यासाठी स्वामींनी शिवरायांना वाघिणीचे दूध आणण्याची आज्ञा केली", अशा भाकडकथा रामदासींकडून रचण्यात आल्या. रामदास म्हणजे मारुती - बजरंग! हे थोतांड पक्कं करण्यासाठी रामदासांना छोटे शेपूटही लावण्यात आलं. ह्या कथा आणि बनावट पत्र- सनदा "रामदासांना शिवरायांचे गुरू" करण्यासाठी वापरण्यात आल्या. त्या खोट्या ठरल्या आणि त्यातून उसळलेल्या वादात रामदास स्वामींची नाहक बदनामी झाली.

रामदास- कोंडदेवच्या गुरुत्वाचा हा भटी बनाव न. र. फाटक, त्र्यं .शं. शेजवलकर, वा.सी. बेंद्रे, सेतुमाधव पगडी यांच्यासारख्या खऱ्या ब्राह्मणांनी उघड्यावर आणला, हे विशेष! तरीही हा खोटेपणा थांबला नाही. तो मराठीतून इतर भाषांत गेला. बलात्काराच्या आरोपाखाली जेलबंद झालेला आसाराम बापू ह्याच्या सत्संगाच्या "ऋषी प्रसाद" ह्या हिंदी मासिकातून शिवराय- रामदासाच्या खोट्या कथांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झालाय. त्याचा लाभ घेण्यासाठी २०१२ च्या गुजरात आणि मध्य प्रदेश विधानसभा निवडणूक प्रचारात "भाजप"ने "शिवराय- रामदास भेटीचे पोस्टर" वापरले. ह्या आधारेच भोंदू बागेश्वर बोलला. ही वस्तुस्थिती असली तरी नागपूरच्या कार्यक्रमात त्याला जाणीवपूर्वक बोलण्यास भाग पाडलं असावं. "रामदास बिना शिवाजी नहीं" असं बोलणाऱ्या (तेव्हा राज्यपाल असलेल्या) भगतसिंग कोश्यारी यांच्यावरील प्रचंड टीका प्रकरण फार जुने नसताना; बागेश्वर बाबानेही तसेच शेण खाणे, ह्यात योगायोग नाही. निश्चित योजकता आहे.

अशाच प्रकारे लोकजागृतीचा अंदाज घेत २००३ मध्ये विदेशी लेखक जेम्स लेन याच्या माध्यमातून राजमाता जिजाऊ आणि शिवाजीराजे यांच्या चरित्राची विटंबना करण्याचा प्रकार घडला. ह्यासाठी रामदास स्वामी आणि दादोजी कोंडदेव यांच्या गुरुत्वाचा वापर करण्यात आला. त्यांच्या माध्यमातून शिवरायांच्या जन्मदात्याबद्दल प्रश्न निर्माण करण्याचा नीच, कुटिल डाव खेळण्यात आला. तो पुणेरी ब्राह्मणी टोळक्याचा 'डार्लिंग' असणारा विदेशी संशोधक- लेखक जेम्स लेन याने उघड्यावर आणला. जी खाजगीत कुजबुज चालायची, ती त्याने "शिवाजी : द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया" ह्या पुस्तकात छापली. जेम्स लेन हा वाहक होता. त्याच्या माध्यमातून जिजाऊ- शिवरायांच्या चरित्राला 'अफजुलखानी डंख' अट्टल 'कोब्रा' नागांनी मारला होता. ह्या हरामखोरीचा मी "साप्ताहिक चित्रलेखा"च्या संपादकीयातून (अंक : २२ डिसेंबर २००३) कठोर शब्दांत वेळीच समाचार घेतला होता. त्याने अस्सल मावळे जागे झाले. 'संभाजी ब्रिगेड'च्या बॅनरखाली एकवटले आणि त्यांनी जेम्स लेनला तीन वर्षे पाहुणचार देणाऱ्या पुण्यातल्या 'भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थे'वर हल्ला केला. हा हल्ला समर्थनीय नव्हता. पण तो का झाला, ह्याची चिकित्सा होणे आवश्यक होते. ती चिकित्सा मी तेव्हा आणि त्यानंतरही शिवचरित्राची छेडछाड करण्याचे प्रकार झाले; त्या प्रत्येक वेळी केली. त्यामुळे लोकजागृती झाली. सनातनी हरामखोरीची चिरफाड करणारे लेखन मोठ्या प्रमाणात प्रकाशित झालं. त्यामुळे छत्रपतींच्या गाद्या सांभाळणाऱ्यांनाही आपल्या जबाबदारीचं भान आलं. परिणामी, बागेश्वरच्या भोंदूगिरीविरोधात जसा आवाज उठला, तसा आमदार संजय गायकवाड यांच्या हैदोसाविरोधातही उठला. पानसरे यांच्या पुस्तकाच्या लाखो प्रतींची यापूर्वीच विक्री झाली आहे. ह्या प्रकरणानंतर पुस्तकाची विक्री आणि मागणी वाढलीय.

तरीही, "गायपट्टा"वाला स्वामी आनंद स्वरूप नाक वर करून म्हणतो, "धीरेंद्र शास्त्री जे बोलले त्याचं मी समर्थन करतो. त्यांनी माफी मागायची गरज नव्हती. शिवाजींनी कधी मैदानात युद्ध लढलं नाही. ते फक्त छापामार युद्ध लढले. पेशव्यांनी युद्धाच्या मैदानात लढाई केली. युद्ध पेशवे लढलेले आणि नाव शिवाजीचं झालं!" आता ह्याचा समाचार घेण्याच्या मोहिमेवर आमदार संजय गायकवाड जाणार का?... नाही जाणार! कारण, त्यातील विषारी प्रचार समजण्याइतकी अक्कल पाहिजे ना! असो. जेम्स लेन आला, बागेश्वर बाबा आणि आणि शिवचरित्राची नासधूस करून गेला असे झालेले नाही. इतिहासाचार्य राजवाडे, ब.मो. पुरंदरे, निनाद बेडेकर आदिंनी लेखनातून शहाजीराजांना सतत गैरहजर दाखवणे, रामदास-कोंडदेव हे 'गुरू' नसताना तसा उल्लेख करणे; कोंडदेवांना सतत शिवबा- जिजामाता यांच्या भोवती दाखवणे, असे उद्योग केले आहेत. पुरंदरेंनी तर त्यापुढे उडी मारून "दादोजी, जिजामाता आणि शिवबा यांचे गोत्र एकच" अशी विकृत कल्पना त्यांच्या शिवचरित्रात मांडलीय. त्याची चर्चा घडावी, ह्याच हेतूने देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री होताच ब.मो.पुरंदरे यांना 'महाराष्ट्रभूषण' (२०१५) पुरस्काराने सन्मानित करण्याचा घाट घातला आणि त्याला महाराष्ट्रभरातून विरोध होऊनही तो तडीस नेला. आताही देवेंद्र फडणवीस यांनी "लोककथा म्हणजे इतिहास नाही," असं म्हणत भोंदू बागेश्वरची सुटका केलीय. अर्थात, 'नाशिकचे पोलीस आयुक्त छत्रपती आहेत का?' असे बोलणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्याकडून वेगळी अपेक्षा करूच नये.

'संघ-भाजप'चे चालक शिवरायांचे नाव घेतात; पण प्रत्यक्षात त्यांच्या उलट विचाराचे काम करतात. त्यांना शिवाजीराजे मतांचे ध्रुवीकरण करणाऱ्या दंगलींसाठी आणि सामाजिक वर्चस्वासाठी पाहिजेत. शिवरायांचे शेतकरीहित, स्त्री सन्मान, सामाजिक समता, उदार धार्मिक धोरण याच्याशी त्यांचे काहीही देणे-घेणे नाही. शिवरायांची नैतिकता आणि प्रगल्भता यांच्यात येणे शक्य नाही. कारण त्यांची ती वृत्तीच नाही; तसा संस्कारच नाही! ह्याची साक्ष ज्ञानोबा- तुकोबांच्या मानवतावादी विचारांपेक्षा 'मनुस्मृती'ला श्रेष्ठ म्हणणारा संभाजी भिडे तथा मनोहर कुलकर्णी वरचेवर देत असतो. अशांपासून विशेषतः बहुजन- मराठा समाजाने दूर राहायला हवं. त्यांना साथ देणे म्हणजे शिवरायांची बदनामी करणार्यांना ताकद देण्यासारखे आहे. लोकशाहीची हत्या करणाऱ्यांना मदत करण्यासारखे आहे.

विद्यमान सरसंघचालक मोहन भागवत इतिहासाचे दाखले देत मुस्लिमांचा 'डीएनए' हिंदूच आहे, असे सांगताना; ब्राह्मणांनी प्रायश्चित्त घ्यावे, दलितांबरोबर 'स्नेहभोजन' करावे, अशी 'समरसता'वादी विधानंही करतात. पण त्याने इतिहास कसा बदलेल, ते मात्र सांगत नाहीत. खरं तर, वर्तमानातला व्यवहार बदलला की इतिहासही बदलतो. कारण आजचा वर्तमान हाच उद्याचा इतिहास असतो. तथापि, ओठात हिंदुत्व आणि पोटात ब्राह्मण्य असले की, शक्य असलेले बदलही घडत नाहीत. म्हणूनच "महिला आरक्षण"च्या मुद्द्यावर "भाजप आणि संघ परिवार"च्या संघटनांनी कितीही धिंगाणा घातला तरी त्यांना 'शंकराचार्य' वा 'सरसंघचालक' ह्या पदावर "महिला का नाही", ह्या प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. त्याऐवजी बहुजन समाजाला नाउमेद करण्यासाठी त्यांच्या महापुरुषांची बदनामी करणारी वक्तव्यं करणे, महिलांचे चारित्र्यहनन करणारे 'जोक्स' तयार करणे, हे उद्योग सातत्याने सुरू ठेवणे, त्यांना हातखंडा सनातनी धंदा असल्यासारखे जमते. हे पुराण- पोथ्यांचे दाखले देत सुरू असते. ह्या हरामखोरीला थेटपणे लाथाडायचं ऐतिहासिक कार्य छत्रपती शिवरायांपासून सुरू झालं. ब्रिटिश गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा 'इतिहासकार'ही होता. त्यानं म्हटलंय, "शिवाजीने ब्राह्मणांना कधीच डोकं वर काढू दिलं नव्हतं. आम्ही त्या सम्राटाचं मराठा राज्य जिंकलंय; पेशव्यांचं नव्हे!"

हा भेद ठाऊक असल्यामुळेच 'मराठ्यांसाठी चार शब्द' लिहिणारे राजारामशास्त्री भागवत (ज्येष्ठ साहित्यिक दुर्गा भागवत ह्यांचे काका) लिहितात, "शिवाजीची लूट किल्ले बांधण्यासाठी होती, तर पेशव्यांचे दरोडे घर भरण्यासाठी व अंधारातील लावण्यांसाठी होते." हा सत्य इतिहास लोकांपुढे येऊ नये, यासाठी पेशवाईत आटोकाट प्रयत्न झाले. आता तेच कार्य "संघ-भाजप परिवार" करीत आहे. त्याचा हा नमुना पहा.

देहू (जिल्हाः पुणे) येथील "गाथा मंदिर"च्या प्रांगणात "समर्थ रामदास साधक स्वामी निवास" ही इमारत पोटात "संत तुकोबाराय गुरुकुल" घेऊन उभी आहे. हे मालकाला भाडेकरू म्हणून ठेवल्यासारखे आहे. याउलट, रामदास स्वामींनी (सातारा - कराड मार्गावरील) चाफळ येथे स्थापलेल्या राम मंदिर - मठ परिसरात तुकाराम महाराजांच्या नावाने काही दिसत नाही. पण त्या स्थानाचं महत्त्व वाढवण्यासाठी छत्रपती शिवरायांच्या नावाचा वापर करण्यात येतोय. रामदास स्वामींच्या चाफळ मठ परिसरातील एका मंदिराखालील (अंडरग्राऊंड) एक खोली रामदासांच्या भेटीला येणाऱ्या शिवरायांची ध्यानाची जागा म्हणून दाखवली जाते. ह्या मठापासून एक किलोमीटर अंतरावर छत्रपती शिवाजीराजे व रामदास स्वामी यांच्या भेटीचे स्थान आकारास आले आहे. या स्थानाच्या बांधकामाची रचना गावात स्वातंत्र्य लढ्यात हुतात्मा झालेल्याचे स्मरण जागते राहावे, यासाठी अब्दुल रहमान अंतुले यांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना (१९८०-८१) गावोगावी बांधलेल्या हुतात्मा स्मारकांच्या वास्तूसारखी आहे. ही वास्तू चारही बाजूने लोखंडी ग्रिल्सने बंद केलीय. आतील चबुतर्यावर शिवराय व रामदास स्वामींच्या छोट्या मूर्त्या आहेत. त्याखाली "या वास्तूचे शरद पवार यांनी उद्घाटन केले" (मुख्यमंत्री, १६ एप्रिल १९९०) अशा मजकुराचा पत्र्याचा बोर्ड आहे. "सोशल मीडिया"वर सध्या व्हायरल झालेला हा फोटो २०१८ मध्ये (ह्याच विषयावरील "सा.चित्रलेखा"तील विषयासाठी-) मी काढलेला आहे. ह्या "शिव- समर्थ भेट" स्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्री पदी असलेल्या शरद पवार यांनी केले असेल, तर दगडाच्या कोनशिलेऐवजी पत्र्याचा बोर्ड का वापरण्यात आला? हा बोर्ड दर्शनी बाजू ऐवजी मागील बाजूस का आहे? मुर्त्या कुलुपबंद का? खोटेपणा पचवण्यासाठीच ही लपवाछपवी आहे ना? असे प्रश्न मी तेव्हा उपस्थित केले होते. आता हाच फोटो शिवराय - रामदास भेटीच्या पुराव्याला शरद पवारांचे समर्थन आहे, अशा थाटात वापरला जातोय.

ही खोटी कामं फत्ते व्हावीत, यासाठी आमदार संजय गायकवाड, भोंदू बागेश्वर, आनंद स्वरूप यांच्या सारख्यांना हत्यारं म्हणून वापरलं जातं. हे देशी जेम्स लेन आहेत. हत्यारांना डोकं नसतं; ते वापरणाऱ्यांना असतं. त्याकडे दुर्लक्ष करू नये.

### जिजाऊंचे स्वराज्यकारण! बहुजनांचे क्षत्रियीकरण!

हिंदुत्वाच्या आवरणाखाली छत्रपती शिवरायांना 'ब्राह्मणशरण' करून दाखवण्यासाठी खोटी कागदपत्रे- सनदा तयार करून रामदास स्वामी व दादोजी कोंडदेव (मूळ नाव 'दादू कोंडी कुळकर्णी') यांना 'गुरुत्व' देण्यात आले. शिवरायांच्या काळात शाहिरी कला बहरली. ती रणमैदानावरचं शौर्य सांगण्यासाठी होती. अफजलखानाचा कोथळा काढल्यानंतर जिजाऊंनी पुत्रप्रेमाने शाहीर आगीनदास यांच्याकडून शिवगौरवाचा पोवाडा लिहून घेतला. तो आगीनदासानं दरबारात गायला. (यावर लोककला अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ यांनी असंख्य तपशिलांसह पुस्तक लिहिलंय.) तो शिवरायांच्या हयातीतील एकमेव पोवाडा ! त्यानंतर २०० वर्ष पेशवाई होती. त्या काळात अनेक शाहीर झाले. त्यांनी बाजीराव, चिमाजी अप्पा, राघोबादादा, माधवराव, नानासाहेब ह्या पेशव्यांच्या शौयार्चे पोवाडे लिहिले; पण त्यापेक्षा कित्येक अधिक पटीने लावण्या लिहिल्या. शाहिराची ओळख 'लावणीकार' अशी बदलली. परंतु, दखल घ्यावी, असा एकही शिवरायांवर पोवाडा शाहिरांनी लिहिला नाही. शिवरायांच्या ऐतिहासिक कायार्चे विस्मरण व्हावे, असाच व्यवहार पेशवाईत झाला आहे.

ह्या दुष्मनीचे मूळ शिवरायांना स्वराज्याचं स्वप्न देणाऱ्या आणि ते साकार करण्यासाठी सर्वप्रकारचे मार्गदर्शन करणाऱ्या राजमाता जिजाऊंच्या ऐतिहासिक कार्यात आहे. विजयनगर वंशातल्या जिजाऊंनी स्वराज्य निर्मितीच्या आड येणाऱ्या ब्राह्मण धमार्चे वर्चस्व हटवून बहुजनांचेही क्षत्रियीकरण केले. त्यामुळे साताराच्या नागेवाडीचा नागनाक महार गडरक्षक- गडकरी झाला. "होता जिवा म्हणून वाचला शिवा," ही म्हण तयार झाली. जिवा महाले हे नाभिक समाजातील होते. ऐतिहासिक कर्तबगारीने ते शिवरायांशी जोडले गेले. परंतु, ह्या जोडीला कुजक्या भटबुद्धीचा "कवी योगेश" ह्याने टोपणनावानं "तांबडी माती" या चित्रपटातील गीतात घुसडलं आणि "जिवा-शिवाची बैलजोड" करून घुमवलं.

अशाच प्रकारचा नीचपणा शेकडो शिवगौरव गीतातून जिजाऊ यांच्या ऐवजी शिवरायांचे 'गुरुत्व' रामदास- कोंडदेवला देऊन केला आहे. त्यासाठी 'गोब्राह्मण प्रतिपालक' हे सोयीचं; पण खोटे बिरुद शिवरायांना चिटकवलं. हे खोटे कर्मकांडी कोण, ह्याचा दाखला देताना आंतरराष्ट्रीय कीतीर्चे 'तुलनाकार' आणि इतिहास-संस्कृती संशोधक डॉ. आनंद पाटील



लिहितात, "१६६३ च्या सुरतेच्या लुटीत त्रास दिला नाही म्हणून 'ईस्ट इंडिया कंपनी'च्या अधिकाऱ्याने शिवरायांना आभाराचे पत्र लिहिले. ते मुस्लीम सेवकाकडे देत तो म्हणाला, 'हे पत्र शिवाजीराजे एकांती असतानाच त्यांना दे. कुठल्याही ब्राह्मणाच्या हाती पडू देऊ नको. ते पत्राला आपली भाषा बोलायला लावतात. राजे पत्राचे उत्तर स्वतःच्या हस्ताक्षरात इंग्रजीत लिहितील. तोपर्यंत थांब. राजे व मातोश्री महत्त्वाची गुप्तपत्रे कुणालाही कळू देत नाहीत,' असे त्याने नोकराला सांगितले."

ही माहिती छत्रपती शिवरायांची कोणती ओळख सांगते ? ज्या जातीला शिवरायांचे चारित्र्य बिघडवता आले नाही; त्याच जातीतली पिलावळ शिवरायांच्या निधनानंतर त्यांचे चरित्र बदनाम करण्याचे काम निरंतर करीत आहे. ब.मो.पुरंदरेंच्या नालायकीचा वारसा, हक्क असल्यागत सांभाळणाऱ्या राज ठाकरे यांनी अलीकडेच "शिवकालीन इतिहास हा ब्राह्मणांनी वा मराठ्यांनी लिहिलेला नाही; तो इंग्रज-विदेशी इतिहासकारांनी लिहिलाय," असं म्हटलंय. ते बरोबरच आहे. तथापि, ब्राह्मण इतिहासकारांनी तो आपल्या सोयीने लिहिलाय, म्हणूनच ब्राह्मणेतर इतिहासकार- अभ्यासकांनी त्यास उपलब्ध असलेल्या अस्सल कागदपत्रांच्या पुराव्यांनी चोख उत्तर दिले आहे.

'प्रबोधन'कार के.सी. ठाकरे म्हणतात, "हे इतिहासकार म्हणजे एकजात ब्राह्मणी पिसांच्या कोंबड्यांचा खरकटवाडा ! जिजाऊंना अफझलखान वधाचे डोहाळे फुटणार तेव्हा कुठे ह्यांचा 'शिवसंभव' व्हायचा !" हे इतिहासाचे वर्तमान ज्यांना समजले, ते कोश्यारी-बागेश्वर - आनंद स्वरूप आदींच्या बेतालपणावर तुटून पडणारच! आपला 'मराठी बाणा' दाखवतानाच शिवधमार्चेही दर्शन घडवणार! 'संघ-भाजप'चं भटी हिंदुत्व आणि भारतीय हिंदुत्व ह्यातला भेद दाखवणार!

यासाठी 'प्रबोधन'कार ठाकरे यांचे 'सत्यशोधक' सहकारी दिनकरराव जवळकर यांनी १०० वर्षापूर्वी शिवाजीराजांवर प्रदीर्घ काव्य लिहिलंय. ते आजही मार्गदर्शक ठरणारं आहे. ते म्हणतात -

शिवाजी अमुचा राणा।
मराठी अमुचा बाणा ॥धृ.
शिवाने धर्म राखिला।
शिवाने शत्रू रगडिला ॥
जगविले हिंदू धमार्ला।
जगविले मायभूमीला ॥१
शिवाजी पालक धर्माचा।
शिवाजी क्षात्र हाडाचा ॥
तयाते शूद्र वदण्याला।
नसावी लाज भटजीला ॥२
शिवाच्या मर्द मराठ्यांनो ।
म्हणती भट शूद्र तुम्हाला हो ॥
आठवी मानी शिवबांना हो।
जनाची लाज माना हो ॥३
जगावे जीवन मानाने।
राहावे स्वाभिमानाने ॥
मराठी हाच हा बाणा।
शिवाचा बोल हा माना ॥४
भटाचे प्रस्थ मोडावे।
रूढीचे पाश तोडावे॥
फुलेंचा असे हा बाणा।
शिवाजी-शाहूला माना ॥५

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मोहोळ तालुक्यात बारावी निकालात मुलींचा दबदबा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल यंदा ७९.७७ टक्के लागला असून, नेहमीप्रमाणे यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचे उत्तीर्ण प्रमाण ९१.२१ टक्के इतके नोंदवले गेले, तर मुलांचा निकाल ७०.१० टक्के इतका आहे.

तालुक्यातून एकूण १,५०८ मुले आणि १,२९९ मुली परीक्षेला बसल्या होत्या. त्यापैकी १,४०५ मुले आणि १,२०३ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त असल्याचे दिसून आले.

**शाखानिहाय निकाल पुढीलप्रमाणे :**

**विज्ञान शाखा :** १,५१३ विद्यार्थ्यांपैकी १,३२९ उत्तीर्ण (८७.५८%)
**कला शाखा :** १,१२५ विद्यार्थ्यांपैकी ७६४ उत्तीर्ण (६५.३९%)
**वाणिज्य शाखा :** ९७ विद्यार्थ्यांपैकी ५३ उत्तीर्ण (६१.८७%)
**व्होकेशनल शाखा :** २८ विद्यार्थ्यांपैकी २७ उत्तीर्ण

**संस्थांनुसार उल्लेखनीय निकाल:**

- कै. शं. बा. पाटील महाविद्यालय, अनगर – १००% (विज्ञान)
- माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, शेटफळ – ९९.२%
- के. शहाजीराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, नरखेड –९८.९१%
- कला शाखेत के. शं. बा. पाटील महाविद्यालय, अनगर – ८९.९२%
- वाणिज्य शाखेत नागनाथ विद्यालय, मोहोळ – ९७.४३%

यंदा विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक लागला असून कला व वाणिज्य शाखांमध्ये तुलनेने कमी निकाल नोंदवला गेला आहे. तरीही सर्व शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी समाधानकारक कामगिरी केली आहे. एकूण निकाल समाधानकारक असून मुलींनी पुन्हा एकदा आपली सरशी सिद्ध केली आहे.

# पाठपुराव्यामुळेच निधी मंजूर – आमदार कल्याणशेट्टी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ–तेरामैल–वळसंग या ८१ किलोमीटरच्या नव्या रस्त्यासाठी ७४० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली असून, हा निधी आपल्या पाठपुराव्यामुळेच मिळाल्याचा दावा अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केला आहे.



या मार्गावर मालवाहतूक, प्रवासी वाहतूक तसेच शेतकऱ्यांची अन्नधान्य वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामुळे वाहतुकीचा ताण वाढून अपघातांचे प्रमाणही लक्षणीय आहे. शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, विद्यार्थ्यांचीही या मार्गावरून मोठ्या प्रमाणात ये–जा असते. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर मोहोळ–तेरामैल–वळसंग रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आपण केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर या प्रयत्नांना यश मिळून ७४० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, असा विश्वास आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला आहे.

# आ. आवताडे यांच्या हस्ते तहसील कार्यालय प्रांगणात ध्वजारोहण

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67 व्या राज्य स्थापना दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक 1 मे 2026 रोजी सकाळी 8.00 वाजता शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, वैभव बुचके, दीपक शिंदे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, स्वातंत्र्य सैनिक, शासकीय अधिकारी–कर्मचारी, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी" वंदे मातरम " गीत राष्ट्रगीत व राज्यगीत गायन झाले. तसेच आणीबाणीच्या काळात बंदीवास सोसावा लागलेल्या पंढरपूर तालुक्यातील व्यक्तींचा आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# जनगणना: स्वयं–गणना प्रक्रियेत आमदार समाधान आवताडे यांनी नोंदवला सहभाग

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र व राज्य शासनाच्या निदेर्शानुसार पंढरपूर तालुक्यात दि.01 मे, 2026 पासून डिजीटल जनगणना मोहिमेला प्रारंभ झाला आहे. पहिल्या टप्प्यात तालुक्यातील प्रत्येक घराची तसेच कुटुंबातील मूलभूत सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67 व्या राज्य स्थापना दिनानिमित्त दि.01 मे 2026 रोजी आमदार समाधान आवताडे, नगराध्यक्षा प्रणिती भालके, नगरसेवक व मान्यवर पदाधिकारी यांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं–गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवला असल्याची माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी जनगणनेबाबतची माहिती उपस्थितांना देवून, नागरिकांनी शासनाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन स्वयं–गणना करून या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन केले.



# मुलांचे बदलते वर्तन ओळखायला शाळाच मदत करणार; 'पालकत्व कॅलेंडर'मुळे गेमिंग व्यसनावरही नियंत्रण

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका अधिक प्रभावी करण्यासाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई)ने २०२६–२७ शैक्षणिक सत्रासाठी नवे 'पालकत्व कॅलेंडर' सुरू केले आहे. या उपक्रमामुळे पालक–शिक्षक बैठकीत पालक केवळ प्रेक्षक न राहता मुलांच्या विकासात सक्रिय भागीदार बनणार आहेत.

शिक्षणाच्या पारंपरिक चौकटीपलीकडे जाऊन मुलांचा मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास घडवण्यावर या कॅलेंडरचा भर आहे. विशेष म्हणजे, घरगुती मानले जाणारे अनेक मुद्दे आता शालेय व्यवस्थेचा भाग बनवण्यात आले आहेत. मुलांच्या वर्तनातील बदल, चिंता, ताणतणाव ओळखण्यासाठी पालकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

तसेच सोशल मीडियाचे धोके, वाढते गेमिंग व्यसन आणि स्क्रीन टाइमचे व्यवस्थापन याबाबत तज्ज्ञांकडून सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शिशुगटापासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे.

या कॅलेंडरमुळे शाळा, शिक्षक आणि पालक यांच्यात अधिक समन्वय साधला जाणार आहे. मुलांमध्ये मोबाईलचे व्यसन आणि करिअरचा वाढता दबाव लक्षात घेता, गंभीर समस्या उद्भवण्यापूर्वीच पालक–शिक्षक संवादातून उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे.

**चार संकल्पनांवर भर**

या 'पालकत्व कॅलेंडर'मध्ये चार महत्त्वाच्या संकल्पनांवर विशेष भर देण्यात आला आहे—

- चिंतन : संगोपनाच्या पद्धतींचा विचार
- प्रोत्साहन : सकारात्मक वर्तनाला उत्तेजन
- आपसातील नाते : पालक–मुलांतील विश्वास दृढ करणे
- आनंदोत्सव : छोट्या यशांचा एकत्र साजरा

या उपक्रमामुळे शिक्षण अधिक व्यापक, संवेदनशील आणि परिणामकारक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोहोळ ते वळसंग मार्ग होणार चारपदरी; ७४० कोटींची तरतूद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तेरामैल राष्ट्रीय महामार्ग ४६५ अंतर्गत मोहोळ–कुरुल–कामती–मंद्रूप (बसवनगर)झ औराद बंकलगीझवळसंग हा मार्ग चारपदरी करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शोल्डरसह विकसित होणाऱ्या या रस्त्याची एकूण लांबी ८१.३७ कि.मी. असून, प्रकल्पाचा अंदाजित खर्च ७४०.३८ कोटी रुपये आहे.



या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून केंद्रीय स्टँडिंग फायनान्स कमिटीने या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे.

या रस्त्याच्या उभारणीमुळे सोलापूर जिल्ह्यातील वाहतूक अधिक सुरक्षित व गतिमान होणार आहे. ग्रामीण व शहरी भागांमधील संपर्क सुधारण्यास मदत होणार असून व्यापार, उद्योग तसेच शेती क्षेत्रालाही मोठा फायदा होणार आहे.

तसेच या मार्गावरील अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. शेतमालाची बाजारपेठेपर्यंतची वाहतूक जलद व कमी खर्चात होणार असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

नवी दिल्ली येथे खासदार प्रणिती शिंदे यांनी या निधीसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन देऊन पाठपुरावा केला होता.

# 'सेल्फी' साठी कनेक्टिंग लिंकवर थांबू नका

## सीसीटीव्हीची २४X७ नजर राहणार



**मुंबई (कटूसत्य वृत्त) :** यशवंतराव चव्हाण मुंबई –पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र, प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.

महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई–पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात मिसिंग लिंकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले.

महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई–पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मयार्दा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मयार्दा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४७७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.

सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका, नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

# सोलापूरसह ११ जिल्ह्यांत मोफत डायलिसिस; ७ जिल्ह्यांत २४ तास एमआरआय सेवा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेत, सरकारकडून ११ जिल्ह्यांमध्ये मोफत डायलिसिस सेवा आणि ७ जिल्ह्यांत २४ तास एमआरआय सेवा सुरू करण्यात येणार आहे. या सेवांचे लोकार्पण महाराष्ट्र दिनानिमित्त आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसिस कार्यक्रमांतर्गत सोलापूर, कोल्हापूर, सातारा, यवतमाळ, बीड, नाशिक, जळगाव, सिंधुदुर्ग, ठाणे, गडचिरोली आणि रत्नागिरी या ११ जिल्ह्यांतील ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयांमध्ये डायलिसिस सेवा सुरू करण्यात येत आहे. सोलापूर (मंगळवेढा), कोल्हापूर (मुरगूड), यवतमाळ (दारव्हा), बीड (केज), नाशिक (इगतपुरी), जळगाव (रावेर), सातारा (ढेबेवाडी), सिंधुदुर्ग (वेंगुर्ला), ठाणे (बदलापूर), गडचिरोली (कुरखेडा) आणि रत्नागिरी (दापोली) येथे ही केंद्रे कार्यान्वित होणार आहेत.

या सुविधेमुळे किडनी रुग्णांना नियमित व पूर्णपणे मोफत उपचार मिळणार असून, मोठ्या शहरांत जाण्याचा खर्च व त्रासही कमी होणार आहे. यापूर्वीच राज्यातील ९२ आरोग्य संस्थांमध्ये सार्वजनिक–खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर डायलिसिस सेवा सुरू असून तीही पूर्णपणे निःशुल्क आहे.

दरम्यान, भंडारा, बुलडाणा, अमरावती, नांदेड, धाराशिव, हिंगोली आणि परभणी या सात जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांमध्ये २४ तास मोफत एमआरआय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ सेवा पुरवठादारामार्फत उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सेवा सहज उपलब्ध होऊन आरोग्य व्यवस्थेला मोठा बळकटी मिळणार असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल–सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर–वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर–वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु–वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु – 240

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | 4 | 5 | 6 | | 9 | | |
| 1 | 8 | 5 | | | 9 | 7 | | |
| | | | | 7 | 8 | 4 | 1 | 5 |
| | 2 | | | 1 | | | 4 | 9 |
| | 4 | 9 | | 5 | | | | |
| | | 1 | 9 | 8 | | 6 | 7 | |
| 4 | 9 | | | 3 | | | | 7 |
| | 1 | 8 | 7 | 4 | 5 | | | 6 |
| | | | | | | | 8 | |

# जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात ध्वजारोहण




**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या 67 व्या राज्य स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक 1 मे 2026 रोजी सकाळी 7.10 वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल लक्ष्मण कसेकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्या सह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी राष्ट्रगीत वंदे मातरम चे गायन झाले. त्यानंतर राष्ट्र ध्वजवंदन व सलामी होऊन राष्ट्रगीत व राज्यगीतचे गायन झाले. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी ज्येष्ठ नागरिक, मान्यवर व अधिकारी /कर्मचारी यांची भट घेऊन त्यांना महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# लोकांच्या कल्याणासाठी राबवलेल्या योजना सकारात्मक बदल घडवून आणतील : संस्कृती सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** दिव्यांग बांधवांसाठी असलेल्या सवलती आणि समाजकल्याण विभागाच्या योजनांची अंमल - बजावणी अधिक प्रभावीपणे कशी करता येईल यासाठी प्रयत्न करावेत.प्रशासकीय पारदर्शकता आणि गतिमानता राखून प्रत्येक गरजू लाभार्थ्याला समाज कल्याण विभागामार्फत योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी कार्यवाही करावी.लोकांच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या या योजना प्रत्यक्ष लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणतील असे मत समाज कल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी व्यक्त केले.



त्या जिल्हा परिषद सोलापूर येथे समाज कल्याण समिती व दिव्यांग विभागाची घेण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी बोलत होत्या.



बैठकीत सविस्तर चर्चा करताना सभापती संस्कृती सातपुते व अधिकारी, कर्मचारी

यावेळी प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी प्रसाद मिरकले, सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा परिषद सदस्य सुप्रिया गायकवाड, सिंधुताई आलदर, करुणा शिवशरण, सविता उंबरजे, श्रुती भोरगुंडे, तेजस्वीनी बोराडे, शिवानी स्वामी, प्रशांत पाटील, नंदकुमार वाघमारे यांच्यासह जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर घेण्यात आलेली सोलापूर जिल्हा परिषदेची समाजकल्याण व दिव्यांग विभागाची महत्त्वपूर्ण बैठक सभापती संस्कृती सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांचा आढावा सभापती संस्कृती सातपुते यांनी घेऊन योजनेची अमंलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

तसेच सन २०२५-२६ मधील २०% मागासवर्गीय कल्याण व ५% दिव्यांग कल्याण योजना यांना सन २०२६-२७ साठी मुदतवाढ, सन २०२६-२७ च्या अंदाज पत्रकानुसार विविध योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठी काम बदल / वस्ती बदल प्रस्तावनेस मंजुरी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहासाठी जि.प. सेस २०२६ -२७ मधून खर्चास मंजुरी, तसेच शिष्यवृत्ती, अनुसूचित वसतिगृह, वृद्धाश्रम आणि वस्ती विकास योजनांबाबत सविस्तर चर्चा समाजकल्याण व दिव्यांग विभागाच्या महत्त्वपूर्ण घेण्यात आलेल्या बैठकीत करण्यात आली.

# ‘शक्तीपीठ’ महामार्ग सरकारच्या फायद्याचा; शेतकऱ्यांनी एकजूट होऊन विरोध करावा - राजू शेट्टी

**करकंब (कटूसत्य वृत्त):** प्रस्तावित ‘शक्तीपीठ’ महामार्गामुळे नागपूर ते गोवा प्रवास जलद व आरामदायी होईल, असे सरकारकडून सांगितले जात असले तरी हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या हिताचा नसून मोठ्या कंपन्या, सत्ताधारी नेते व संबंधित घटकांच्या फायद्याचा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी एकजूट होऊन या महामार्गाला कडाडून विरोध करावा, असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले. करकंब येथील श्री कनकंबा माता मंदिरात ‘जन आक्रोश आंदोलन’च्या पार्श्वभूमीवर आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



पुढे बोलताना शेट्टी म्हणाले की, ‘या शक्तीपीठ महामार्गामागे मोठ्या शक्ती कार्यरत आहेत. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे या प्रकल्पाचे मुख्य सूत्रधार आहेत. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांनी आपली जमीन वाचवली पाहिजे. अनेकांनी मोठ्या कर्जातून शेती विकसित केली आहे. अशा परिस्थितीत जमीन जाणे म्हणजे शेतकऱ्यांसाठी मोठा फटका आहे.’

मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांनी एकजूट राहण्याची शपथ घेतली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेसोबत राहून आंदोलन तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. काही शेतकऱ्यांनी संघटनेनेच आतापर्यंत साथ दिल्याचे सांगत पुढेही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

पंढरपूर, सांगोला, जत, कोल्हापूर मार्गे जाणाऱ्या या महामार्गाला यापूर्वीही संघटनेने विरोध केला होता. त्यामुळे मार्गात बदल करावा लागल्याचा दावा शेट्टी यांनी केला. तसेच काही दलालांकडून जास्त मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवले जात असल्याने शेतकऱ्यांनी सावध राहावे, असा इशाराही त्यांनी दिला.

या मेळाव्यास शिवाजी पाटील, तानाजी बागल, सचिन पाटील, युवा अध्यक्ष अमरसिंह कदम, सचिन अटकळे, रणदिवे, सिद्धेश्वर घुगे, बाहुबली तावरे, बापू गायकवाड, नितीन बागल, शरद पांढरे आदींसह अनेक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश व्यवहारे यांनी केले, तर आभार शरदचंद्र पांढरे यांनी मानले.

# नेताजी शिक्षण संकुलात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ६७ वा महाराष्ट्र दिन व १३५ वा जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर इयत्ता चौथीत प्रथम क्रमांक पटकाविलेल्या श्राव्या नडगेरी या विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी प्राचार्य रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष पुजारी, नागेश कोल्हापुरे,



मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार , रुपाली नडगेरी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राथमिक शाळेतील आदित्य बिराजदार, श्रावणी नागठाण, श्राव्या नडगेरी माध्यमिक प्रशालेतील जान्हवी कांबळे, पृथ्वीराज जमादार, व्यंकटेश मिस्कीन, इरेश अक्का,ओंकार एडके व महाविद्यालयातील पल्लवी भोरगुंडे, रेवती कुलकर्णी, जयश्री भोरगुंडे, सुधाश्री चिटकुल, लक्ष्मी निंबर्गी, भार्गवी शिरपूर, स्वाती ठोंबरे, योगिता पगड्याल ,श्रावणी पवार या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कामगार दिनानिमित्त नागेश कोल्हापुरे यांना आदर्श कामगार पालक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रमुख अतिथी विजयकुमार हुल्ले म्हणाले, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच कष्टाची जोड देऊन जीवनात यश संपादन करावे.प्राचार्य रविशंकर कुंभार म्हणाले, प्रत्येक यशामागे कष्ट आणि शिस्त महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांनी या मूल्यांचा अंगीकार करून आपले भविष्य घडवावे.

यावेळी इयत्ता पाचवी ते नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले तर विश्वाराध्य मठपती यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी होण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# स्त्रीया शिकल्या तर कुटुंब सुशिक्षित त्यासाठी नारीशक्तीचा सन्मान गरजेचे : राजकुमार हिवरकर पाटील

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांना शिक्षण, समता आणि सन्मान मिळवून देण्यासाठी ऐतिहासिक लढा दिला. ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिकवून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.स्त्रियांसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाचा पाया रचला, तर आंबेडकरांनी संविधानाद्वारे कायदेशीर अधिकार, समान वेतन आणि मालमत्तेत वाटा मिळवून देत महिलांना गुलामगिरीतून मुक्त केले.म्हणूनच स्त्रीया शिकल्या तर कुटुंब सुशिक्षित होतं त्यासाठी नारीशक्तीचा सन्मान होणे गरजेचे असल्याचे मत शिसेनेना ओबीसीचे सोलापूर जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथे शिवसेना शिंदे गट व राजगड नॉलेज सिटी, राजगड पतसंस्था नातेपुते यांच्या सहकायार्तून व महात्मा



ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या शताब्दी निमित्त महिलांसाठी ५० टक्के शिलाई मशीन वाटपाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

यावेळी राजकुमार हिवरकर पुढे बोलत असताना म्हणाले की, हाप शटर शिलाई मशिन व पिको फॉल शिलाई मशिन आपण वाटप करत असुन दि १ मे ते ११ मे पर्यंत शिलाई मशिनचे वाटप नातेपुते येथील शिवसेना भवन शंकरराव कॉम्पलेक्स येथे केले जात असुन महिलांनी त्यासाठी आपले आधारकार्ड झेरॉक्स सोबत आणावे. शिलाई मशीनच्या माध्यमातुन ग्रामीण आणि शहरी महिलांसाठी घरबसल्या दरमहा १५ ते २० हजार रुपयांपर्यंत कमाई करण्याचा एक उत्तम मार्ग महिलांना मिळणार आहे. त्यामुळे जास्ती जास्त महिलांनी या शिलाई मशिन वाटप योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी शिवसेनेचे राजकुमार हिवरकर पाटील यांनी केले आहे.

यावेळी उपस्थित महिलांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्रासह शिलाई मशीन सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी यावेळी मंचावर उपस्थित राजगड नॉलेजसिटीचे चेअरमन तथा शिवसेना जिल्हाप्रमुख ओबीसीचे राजकुमार हिवरकर पाटील राजगड नॉलेज सिटीच्या मुख्याध्यापक झगडे, यादव पेट्रोलियमचे अमोल यादव, लोणारी पेट्रोलियमचे किशोर लोणारी, राजगड नॉलेज सिटीचे व्हाईस चेअरमन शैलेश जोशी, संचालक रोनक चंकेश्वरा, विनायक शिंदे, डॉ. राजेंद्र जठार, नवनाथ पिसे, फोंडशिरस तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजी कोळी, भाजपाचे मनोज जाधव, तेजस गोरे, सुनील बनकर, महात्मा फुले दूध संकलन केंद्राचे चेअरमन रणजीत जठार, आरपीआयचे बादल सोरटे, शिवसेनेचे पोपटराव शिंदे, शब्बीर तांबोळी, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे रियाज शेख, सागर भोसले, अजय टेंबरे , आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापुरात ‘फलज्योतिष व बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद’

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** अंधश्रद्धेविरोधात जनजागृती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांच्या वतीने रविवारी (दि. ३ मे) सोलापुरात ‘फलज्योतिष आणि बुवाबाजी विरोधी संघर्ष परिषद’ आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह, डफरीन चौक येथे होणार असल्याची माहिती समितीचे कायदा विभाग राज्य कार्यवाह ॲड. गोविंद पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

परिषदेचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता माजी आमदार नरसय्या आडम यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी समितीचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, हभप ज्ञानेश्वर बंडगर महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यानंतर ‘फलज्योतिष : समज आणि वास्तव’ या विषयावर दुसरे सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात प्राचार्य डॉ. नितीन शिंदे मार्गदर्शन करणार असून अध्यक्षस्थानी दादा चांदणे राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सचिन जम्मा उपस्थित राहणार आहेत.

दुपारी २:३० वाजता तिसरे सत्र होणार असून ‘राजकारण आणि बुवाबाजी’ या विषयावर नितीन सावंत (परभणीकर) आणि श्रीकांत सोनवणे मार्गदर्शन करणार आहेत. या सत्राचे अध्यक्ष प्रा. रवींद्र चिंचोळकर असतील. कार्यक्रमाचा समारोप प्रा. एम. आर. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून नंदकुमार फाटे, रवींद्र मोकाशी, प्रा. प्रदीप जगताप आदी उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. गोविंद पाटील यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस धर्मराज चवरे, रमेश खाडे, सुधाकर काशीद, ॲड. संजय कांबळे, रमेश आदलिंगे आदी उपस्थित होते.

# नेताजी महाविद्यालयाचा बारावीचा ९०.२७ टक्के निकाल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९०.२७ टक्के इतका लागला. विज्ञान शाखेचा १०० %, वाणिज्य शाखेचा ९०.३८% तर कला शाखेचा ८०.४३ % इतका निकाल लागला.विज्ञान शाखेतून विजयालक्ष्मी देगील (७१. ३३%),आश्रित म्हेत्रे (६८.५० %), संजना माळी (६५.३३ %) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. वाणिज्य शाखेतून आयेशा मकानदार (६७. ७०%), संजना गडगी (६६. १७%), माया गडदे(६५%) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. कला शाखेतून अंकिता खोकले (७१. १७%), साईराम दासरी (६४. ६७%), सुमा मठ (६३.८३%) गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविले. या विद्यार्थ्यांना प्रा. अमरनाथ दुस्सा, प्रा.दिपक नरोणे, प्रा.महेश नराल, प्रा.शांतेश करजगी, प्रा.चंद्रशेखर पाटील, प्रा.अनिल अंबारे,प्रा.अंगद तोरणे, प्रा.गीता चव्हाण, प्रा.राजश्री स्वामी, प्रा.प्रज्ञा भरमशेट्टी, प्रा.विद्या चिक्काळे आदी प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी अभिनंदन केले.

# सोलापूर- सातारा जलतरण तलाव प्रकरणात भ्रष्टाचाराचा ठपका

## क्रीडाधिकारी निलंबित

**सातारा (कटूसत्य वृत्त):** सोलापूर व सातारा येथील जलतरण तलाव प्रकल्पांमध्ये कथित आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचार केल्याच्या आरोपांवरून सातारा जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर यांना निलंबित करण्यात आले आहे. याबाबत महाराष्ट्र क्रीडा व युवक सेवा संचालनालय चे सहसंचालक सुधीर मोरे यांनी अधिकृत आदेश जारी केला.

प्राप्त माहितीनुसार, सोलापूर आणि सातारा येथील जलतरण तलाव प्रकल्पांशी संबंधित आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार समोर आली होती. या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या चौकशीत प्राथमिक टप्प्यात काही गंभीर बाबी निदर्शनास आल्याचे समजते. त्यानंतर प्रशासनाने तत्काळ कारवाई करत तारळकर यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला.

दरम्यान, निलंबनाचा आदेश जारी झाल्याच्याच दिवशी नितीन तारळकर रजेवर गेल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. सोलापूर व सातारा येथील संबंधित कार्यालयांतील कामकाजाची सखोल चौकशी सुरू असून, या प्रकरणात आणखी काही धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# निमगावात शक्तिपीठ महामार्गाला समर्थन

## जास्तीच्या मोबदल्यासाठी मुख्यमंत्र्यांना देणार निवेदन

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संभाव्य शक्तीपीठ महामार्गाला माळशिरस तालुक्यातील निमगाव, वेळापूर, माळखांबी,गारवड सह इतर गावातून जवळपास 90 टक्के शेतकऱ्यांनी समर्थन दिले असून हा शक्तिपीठ महामार्ग व्हावा परंतु शक्तिपीठ महामार्ग होत असताना आमच्या जमिनीचा दहापट मोबदला मिळावा अशी मागणी केली असून लवकरच याबाबतीत माळशिरस तालुक्यातील शिष्टमंडळ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून या संदर्भात निवेदन देणार असल्याचे सांगितले.

शक्तिपीठ महामार्ग समर्थन समितीच्या वतीने निमगाव येथे रविवारी पत्रकार परिषद आयोजित केली होती या पत्रकार परिषदेस निमगाव, वेळापूर, माळखांबी, गारवड आदी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी शक्तीपीठ महामार्गाचे उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले तर दुसऱ्या



> शक्तीपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांमध्ये इतर लोकांची संख्या जास्त आहे ज्यांचे क्षेत्र या महामार्गात जात आहे त्या 90 टक्के लोकांचा पाठिंबा आहे परंतु विनाकारण विरोधाभास केला जात आहे विरोध करणाऱ्या लोकांना आमची विनंती आहे आमची काळजी करण्यापेक्षा भावी पिढीचा व आपल्या विकासाचा विचार करून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा व तालुक्याच्या व गावच्या विकासाला हातभार लावा.
>
> **- किरण पाटील,** ग्रा पं सदस्य, निमगाव

बाजूला शक्तिपीठाच्या विरोधात रान उठवले जात असून स्वाभिमानीचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांची नुकतीच वेळापूर येथे शक्तिपीठ महामार्ग रद्द व्हावा यासाठी सभा झाली होती या अनुषंगाने निमगाव येथील पत्रकार परिषदेकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

या पत्रकार परिषदेस निमगाव व परिसरातील जवळपास 90% बाधित शेतकरी उपस्थित होते या सर्व बाधित शेतकऱ्यांनी शक्तीपीठ महामार्गाला जमिनी देण्यास समर्थन दिले असून जमिनीचा वाढीव मोबदला मिळावा असा आशावाद व्यक्त केला आहे जे शक्तिपीठ महामार्गाला विरोध करणाऱ्यांमध्ये बाधित शेतकऱ्यांची संख्या किती आहे हेही सरकारने तपासावे असेही यावेळी उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने सरकारला विनंती करण्यात आली या महामार्गामुळे दळणवळणाची साधने वाढून शेतीमालाला बाजार भाव मिळणार आहे या महामार्गाबाबत अनेक अफवा पसरविल्या जात आहेत सर्विस रोड, पाईपलाईन पासिंग, अंडरपास किंवा बोगदे याबाबत शंका व्यक्त केल्या जात आहेत परंतु शक्तीपीठ महामार्गाच्या दोन्ही बाजूने सर्विस रोड, पाचशे मीटर अंतरावर अंडरपास पलीकडच्या बाजूला राहणाऱ्या शेतजमिनीस पाईपलाईन नेता येणार आहे यामुळे शक्तिपीठ महामार्गाचे स्वागतच आहे परंतु मोबदल्यासाठी सरकारसोबत चर्चा करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# युद्ध नको बुद्ध हवा हीच तत्त्वप्रणाली स्वीकारावी- मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** गौतम बुद्ध यांनी मानवतेची शिकवण दिली, त्यामुळे बौद्ध धमार्चा प्रसार संपूर्ण जगात झाला परंतु आता त्यांच्या शिकवणुकीचा विसर पडल्यामुळे विध्वंसक जागतिक युद्ध सुरू झाले आहे, हे युद्ध थांबवायचे असेल तर युद्ध नको बुद्ध हवा ही तत्व प्रणाली स्वीकारली पाहिजे असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गौतम बुद्ध जयंती निमित्त कार्यक्रम



कल्याणशेट्टी महाविद्यालयात गौतम बुद्धाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यावेळी मल्लिनाथ कल्याणशेट्टी व मान्यवर

आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, इराण अमेरिका युद्धामुळे जगामध्ये अशांतता आहे. पेट्रोल गॅस च्या किमती भडकले आहेत, जीवघेणी स्पर्धा विकोपाला गेली आहे, अशा स्थितीत गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आचरणात आणून जगातील मानव जातीस दिलासा देण्याची भूमिका जागतिक राजकारण्यांनी घेतली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले आभार कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी मानले कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, प्रा हर्षदा गायकवाड, प्रा सौरभ भस्मे प्रा ओंकार घिवारे, प्रा शिवकुमार मठदेवरु उपस्थित होते.